# ओबीसी महिलांच्या आरक्षणात पुन्हा घोळ?

## ■ राष्ट्रवादीच्या सौ. मंगनाळेंनी मागितली दाद



नांदेड, दि.२८: महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रभाग रचना आरक्षणाची सोडत दुसऱ्यांदा केल्यानंतरही त्यात पुन्हा ओबीसी महिलांच्या आरक्षणात गोंधळ झाल्याचा दावा करण्यात आला आहे. राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या शहराध्यक्षा व माजी नगरसेविका सौ. कृष्णा मंगनाळे यांनी दोन्ही सोडतीत ओबीसी महिलांसाठी राखीव झालेल्या जागेबद्दल आक्षेप घेतला आहे. हें आरक्षण चुकल्यामुळे आपल्याला प्रभागातून निवडणूक लढविण्यासाठी सर्वसाधारण महिलेसाठीच्या हक्काच्या आरक्षणापासून वंचित राहावे लागले असल्याची तक्रार त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे केली आहे.

सौ. कृष्णा मंगनाळे यांनी गेल्या १९ जुलै रोजी आरक्षणाच्या सोडतीबाबत आक्षेप घेतला होता. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यापैकी कोणत्याही एका प्रवर्गातील महिलेसाठी राखीव असलेल्या प्रभागात ओबीसी महिलेची जागा राखीव ठेवता येत नाही, असा नियम आहे. परंतु, अनुसूचित जमाती महिलेसाठी राखीव असलेल्या प्रभाग ४ (हनुमानगड) तसेच अनुसूचित जाती महिलेसाठी राखीव

### बुद्धिबळातील पेच



बुद्धिबळात अडीच घर चालणारा घोडा सर्वांना हैराण करून सोडत असतो. तशीच परिस्थिती ओबीसी महिलांना राखून ठेवण्यासाठी केलेल्या नियमाची झाली आहे. शासनाने गेल्या १३ जून २०१६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत नियम क्र. ६ मधील ३ (ब) चा अडीच ओळीचा परिच्छेद सर्वांनाच संभ्रमात टाकणारा आहे. ''ज्या प्रभागातील एक किंवा अधिक जागा एकतर अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा दोन्ही करीता राखीव असतील, परंतु त्या जागा, त्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव नसतील, तर अशा प्रभागातील नागरिकांच्या मागास वर्ग प्रवर्गाची जागा महिलांसाठी राखून ठेवण्यात येईल'', असे या नियमात म्हटले आहे. यातील असतील–नसतील या शब्दांनी मोठा गोंधळ निर्माण केल्यामुळेच याआधीच्या सोडतीत ओबीसी महिलांच्या आरक्षणात चूक झाल्याचे सांगण्यात येते.

### ओबीसी महिलांच्या ...

भागातील सोडतीबाबत आक्षेप घेतला आहे. हनुमानगडची सर्वसाधारण महिलेची जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी अचानक करण्यामागचे कारण काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. हनुमानगडाच्या जागेवरुन आधीही घोळ झाला होता.


...ढिळला. तर३५३जणाच ...
...ीकांकडे परवाने ...
... वसूल करण्यात आला. ...
...,सदस्य सर्वश्री किसन क...
...ला.

पाहिजेत
शक्ती ट्रॅक्टर्स शोरुमसाठी सेल्स एक्झीकेटीव्ह पाहि... –५ तसेच ऑफीस कामासाठी ऑफीस बॉय पाहिजेत ... संपर्क : नॅशनल डि... पेट्रोल पम्प जवळ हैद्रा... नांदेड
८८०५७७४७७...
भेटण्याची वेळ १०.३०

दुकाने भाड्याने देणे आहे
गणेश टॉकीज रोडवर रविदास व्यापारी संकुल... १० फुट X२० फुटाचे च... कटलरी, प्लास्टीक, ... कपडा, गार्मेन्ट, करीता देणे आहे. व्यापाऱ्यां... साधावा. मो.९४२२४१४...

LEARN N...
- GUITAR, - DRU...
- VOilin,- Vocal
- Flute - ZUMBA
DANCE Forms.


(8)

# मनपात आक्षेपावर दिवसभर सुनावणी

नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मनपा प्रशासनाने वार्ड रचना जाहिर केली होती. या वार्डरचनेवर अनेक आक्षेप आले होते. या आक्षेपाची सुनावणी शुक्रवारी स्थायी समितीच्या सभागृहात निवडणुक विभागाचे अधिकारी संतोष कुमार यांच्या उपस्थितीत पार पडली.

नांदेड वाघाळा महानरगपालिकेची ऑक्टोंबर महिन्यात सार्वत्रिक निवडणुक होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मनपा प्रशासनाने वार्ड रचना व आरक्षण जाहिर केले होते. परंतु वार्डरचनेवर अनेकांनी आक्षेप घेतला होता. तसेच आरक्षणावरुन निवडणुक आयोगाने आक्षेप घेतला होता. त्यामुळे दुसऱ्यांदा आरक्षण काढण्यात आले. यामुळे मनपा प्रशासनाची चांगलीच अडचण झाली. त्यातच आक्षेपाची संख्या लक्षणीय होती. या आक्षेपावर सुनावनी घेण्यासाठी निवडणुक विभागाने संतोष कुमार यांची नियुक्ती केली. त्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी सकाळी ११ पासुन स्थायी समिती सभागृहात



आक्षेपावर सुनावनी झाली. एका एका प्रभागनिहाय आक्षेपावर सुनावनी घेण्यात आली. त्यामुळे गदारोळ उडाला नाही. सायंकाळी ४.३० पर्यंत

पान ४ वर >>

### मनपात आक्षेपावर दिवसभर...

आक्षेपावर सुनावंनी झाली. सुनावली झाल्यानंतर कोणतीही माहिती देण्यात आली नाही. रात्री उशिरापर्यंत महापालिकेतील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता किती आक्षेप फेटाळले व किती आक्षेप मान्य केले याची माहिती दिली जात नव्हती. परंतु ज्या नागरिकांनी आक्षेप सादर केले ते आक्षेप निवडणुक आयोगाच्या नियमानुसार योग्य असलेल्यांची नोंद संतोष कुमार यांनी घेतली असल्याची चर्चा आक्षेप कर्त्यात होती.